# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.11.2024** **वारःशनिवार**

---

ठळक बातम्या,

- बोडो शांतता करारामुळे, आणखी अनेक शांतता करारांसाठीचा मार्ग खुला . पंतप्रधान नरेंद्र मोदी
- पंतप्रधान आजपासून नायजेरिया, ब्राझिल आणि गुयाना देशांच्या दौऱ्यावर
- अंमली पदार्थ नियंत्रण पथकाच्या मोठ्या कारवाईत कोकेनचा 900 कोटी रुपयांचा साठा दिल्लीत जप्त
- झाशी वैद्यकीय महाविद्यालयातील शिशु अति दक्षता विभागाला लागलेल्या आगीत 10 बालकांचा मृत्यू आणि
- दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेत भारताचा विजय

मोदी बोडो

बोडो शांतता कराराचा केवळ बोडो समुदायालाच फायदा झाला नसून आणखी अनेक शांतता करारांसाठीचा मार्ग खुला झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शांतता करारामुळे एकट्या आसाममध्ये 10 हजाराहून अधिक तरुणांनी शस्त्रे आणि हिंसाचार सोडला असून ते मुख्य प्रवाहात सामील झाल्याचं मोदी यांनी काल नवी दिल्लीतल्या पहिल्या बोडोलँड महोत्सवाला संबोधित करताना सांगितलं. केंद्र सरकारने बोडोलँडच्या विकासासाठी 1,500 कोटी रुपयांचं विशेष पॅकेज दिलं आहे. आसाम सरकारनेही त्यासाठी विशेष विकास पॅकेज दिलं असल्याची माहिती त्यांनी दिली. बोडो-लँडमध्ये शिक्षण, आरोग्य आणि संस्कृतीशी संबंधित पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी 700 कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे. बोडोलँडमध्ये जवळपास 50 वर्षे हिंसाचार आणि रक्तपात झाल्यानंतर आता झालेला विकास पाहून समाधान वाटत असल्याचं मोदी म्हणाले. नक्षलवादाच्या वाटेवर असलेल्या लोकांनी, बोडो लोकांकडून काहीतरी शिकावं असं त्यांनी सांगितलं. 2020 च्या बोडो शांतता करारानंतर कोक्राझारला भेट देताना समाधान वाटलं असं मोदी म्हणाले.

कौशल्य, उद्योजकता, रोजगार आणि विकास याचा बोडो तरुणांना मोठा फायदा होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आसामसह संपूर्ण ईशान्य, ही भारताची अष्टलक्ष्मी आहे आणि विकसित भारताच्या संकल्पाला नवी ऊर्जा देण्यासाठी पूर्व भारतातून विकासाची पहाट उगवेल, असे गौरवोद्गार पंतप्रधानांनी व्यक्त केले .

मोदी-त्रिदेशदौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून नायजेरिया, ब्राझिल आणि गुयाना या तीन देशांच्या दौऱ्यावर जात आहेत. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद तीनुबू यांनी, पंतप्रधानांना नायजेरिया भेटीचं निमंत्रण दिलं होतं. देशाच्या पंतप्रधानांनी नाईजेरियाला भेट देण्याचा गेल्या 17 वर्षांमधला हा पहिलाच प्रसंग आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नाईजेरियामधील वरिष्ठ नेत्यांबरोबर धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील आणि द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करण्यासाठी चर्चा करतील. नायजेरियातील भारतीय समुदायाबरोबर पंतप्रधान संवाद साधणार आहेत. भारताची नायजेरिया बरोबर आर्थिक, ऊर्जा आणि संरक्षण सहकार्य क्षेत्रात, वर्ष 2007 पासून, धोरणात्मक भागीदारी आहे. दोनशेहून अधिक भारतीय कंपन्यांनी नायजेरियातील महत्त्वाच्या क्षेत्रात 27 अब्ज डॉलरहून अधिक गुंतवणूक केली

आहे. 18 तारखेला मोदी ब्राझीलच्या रिओ डी जनेरियो शहरात आयोजित जी-20 शिखर परिषदेला उपस्थित राहतील. या परिषदे दरम्यान, पंतप्रधान विविध जागतिक मुद्द्यांवर भारताची भूमिका मांडतील आणि जी-20 च्या नवी दिल्लीतील नेत्यांच्या जाहिरनाम्या संदर्भात तसंच अलीकडेच भारतानं आयोजित केलेल्या ग्लोबल साऊथ समिटच्या परिणामांवर आपली भूमिका मांडतील. 19 ते 21 नोव्हेंबर या कालावधीत पंतप्रधान गयानाला जातील. 1968 नंतर एखाद्या भारतीय पंतप्रधानाची, गयानाची, ही पहिली भेट असणार आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी, राष्ट्राध्यक्ष डॉक्टर मोहम्मद इरफान अली आणि इतर वरिष्ठ , नेत्यांची भेट घेतील.

कोकेन

अंमली पदार्थ नियंत्रण पथकाने दिल्लीत केलेल्या मोठ्या कारवाईत, कोकेनचा 900 कोटी रुपयांचा मोठा साठा जप्त केला आहे. गृह मंत्रालयाने दिलेल्या महितीनुसार परदेशातील काही जणांची ही टोळी अंमली पदार्थाची तस्करी करत होती. जप्त केलेल्या कोकेनमधील काही कोकेन, कुरिअर किंवा छोट्या मालवाहू सेवांद्वारे ऑस्ट्रेलियाला पाठवण्याचं नियोजन होतं . आत्तापर्यंत, या टोळीतील दोन प्रमुख सदस्यांना अटक करण्यात आली असून जप्त केलेल्या कोकेनचा उगम शोधण्यासाठी आणि अन्य धागेदोरे मिळवण्यासाठी तपास सुरू आहे. अंमली पदार्थ नियंत्रण पथकाच्या या मोठया यशाबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अभिनंदन केलं आहे. बेकायदेशीर अंमली पदार्थ तस्करीविरूद्ध एका दिवसात मिळालेल्या या यशामुळे सरकारचा ड्रग्जमुक्त भारत निर्माण करण्याचा दृढ संकल्पच दिसून येत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

व्यापर मेळा

नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे सुरू असलेल्या 43 व्या भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यामध्ये; मंत्रालय दालनाचं उद्घाटन, काल केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री, डॉ. वीरेंद्र कुमार यांनी केलं. दुर्लक्षित कारागीर आणि उद्योजकांची आर्थिक उन्नती सुलभ करण्याच्या दृष्टीने मंत्रालयानं या दालनात 100 पेक्षा जास्त दुर्लक्षित कारागिरांना सहभागी करून घेतलं असल्याचं त्यांनी सांगितलं. इथली हातमाग, हस्तकला आणि इतर सर्व उत्पादनं ही 'मेड इन इंडिया' असून दिव्यांगजन कारागिरांची कला प्रदर्शित करणारे 35 स्टॉल्सही, इथे उभे केले आहेत.

ईपीएफओ

देशभरात मोठ्या प्रमाणावर बचत निर्माण करण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षा तरतुदींमध्ये वाढ करण्यासाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेनं केलेल्या लक्षणीय बदलाचं, केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ मनसुख मांडविय यांनी कौतुक केलं आहे. काल नवी दिल्ली इथे EPFO च्या 72 व्या स्थापना दिनानिमित्त बोलतांना त्यांनी EPFO च्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या सदस्यांच्या सेवेकरता - सर्वोच्च सचोटी, समर्पण, सहानुभूती, आणि, व्यावसायिकता मानकांचं पालन करण्याचं आवाहन केलं. यावेळी भविष्य निधी पुरस्कार, 2024 प्रदान करण्यात आले. नागरिकांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी विकसित भारतातील ईपीएफओच्या भूमिकेचा मांडवीय यांनी पुनरुच्चार केला.

उत्तर प्रदेश- दवाखाना

उत्तर प्रदेशातील झाशी वैद्यकीय महाविद्यालयातील, शिशु अति दक्षता विभागाला, काल रात्री लागलेल्या आगीत, 10 नवजात बालकांचा मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विद्युत तारांच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता असल्याचं, जिल्हा अधीक्षक अविनाश कुमार यांनी सांगितलं. या शिशु अति दक्षता विभागात 54 बालकं दाखल झाली होती. त्यातील अनेक बालकांना वाचवण्यात यश आलं आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेचा आढावा घेऊन जिल्हा प्रशासनाला मदतकार्य जलद गतीनं करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

इस्रायल लेबनॉन

काल लेबनॉनमध्ये देशाच्या उत्तर-पूर्व भागात आपत्कालीन प्रतिसाद केंद्रावर इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान 15 बचाव आणि आपत्कालीन कर्मचारी ठार झाले. बालबेक शहराजवळील डोरीस इथे झालेल्या हल्ल्यात नागरी संरक्षण दलाची इमारत उद्ध्वस्त झाल्याची माहिती प्रादेशिक गव्हर्नर बचीर खोडर यांनी दिली. पीडितांमध्ये शहराचे नागरी संरक्षण प्रमुख, बिलाल राद यांचाही समावेश आहे.

क्रिकेट

जोहान्सबर्गमधील वांडरर्स स्टेडियमवर काल झालेल्या, चौथ्या आणि अंतिम टी ट्वेंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात, भारतानं दक्षिण आफ्रिकेचा 135 धावांच्या मोठ्या फरकानं पराभव केला. या विजयासह भारतानं चार सामन्यांची टी-20 मालिका 3-1 अशी खिशात घातली आहे. विजयासाठी 284 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा डाव 18 षटक 2 चेंडूत 148 धावांवर आटोपला. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित 20 षटकांत 1 गडी बाद 283 धावा केल्या. नाबाद तिलक वर्माने 47 चेंडूत 120 धावा केल्या तर सलामीवीर संजू सॅमसन ने 56 चेंडूत 105 धावा केल्या.
संजू सॅमसन आणि तिलक वर्मा या दोघांनी केलेल्या शतकाच्या जोरावर भारतानं 283 धावा केल्या. भारताची परदेशातील ही सर्वोच्च धावसंख्या ठरली. या दोघांनी तुफान फटकेबाजी करत सर्वात मोठी 210 धावांची भागीदारी रचण्याचा विक्रम केला. त्याचबरोबर एकाच टी-20 सामन्यात शतकी खेळी करून दाखवणारे पहिले फलंदाज ठरले आहेत. संजू एकाच वर्षात तीन आंतरराष्ट्रीय टी20 शतक ठोकणारा पहिला तर तिलक सलग दोन आंतरराष्ट्रीय टी20 शतक करणारा सॅमसननंतरचा दुसरा खेळाडू ठरला. ही दुसऱ्या गड्यासाठी झालेली आतापर्यंतची सर्वोच्च भागीदारी ठरली. दक्षिण आफ्रिकेकडून ट्रिस्टन स्टब्सने सर्वाधिक 43 धावा केल्या तर भारताच्या अर्शदीप सिंगने 3 बळी घेतले. तिलक वर्माला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.